कै. बाळासाहेब सावंत यांचे मौजे जाकिमि-या, ता.रत्नागिरी येथे उभारण्यात येणा-या स्मारकाच्या बांधकामास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः स्मारक ३१०९/प्र.क्र. ५०/२९
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
दिनांक : १३ एप्रिल, २०१८

वाचा :-

१) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. स्मारक ३१०९/प्र.क्र.५०/०९/२९, दि.३१ मार्च,२०१०
२) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.स्मारक ३११०/प्र.क्र.५०/२००९/२९, दि. १८ नोव्हेंबर, २०१०
३) जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचे पत्र क्रमांक ससाशा/कार्या-१५/कावि-३५७/२०१५, दि.३० नोव्हेंबर, २०१६

प्रस्तावना :

कै. बाळासाहेब सावंत यांचे मौजे जाकिमि-या, ता.रत्नागिरी येथे उभारण्यात येणा-या स्मारकाच्या कामास संदर्भिय शासन निर्णय दिनांक १८ नोव्हेंबर, २०१० अन्वये रु.१०४.९३ लक्ष इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून अनु.क्र.१ येथील शासन निर्णयान्वये रु.५०.०० लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास प्राप्त झाले आहे. जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी संदर्भिय क्र.३ च्या पत्रान्वये रु. १५६.०९ लक्ष किंमतीचा सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव सादर केला असून सदर प्रस्तावास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी यांनी सादर केलेल्या कै. बाळासाहेब सावंत यांच्या स्मारकाच्या सुधारित प्रस्तावाची छानणी सार्वजनिक बांधकाम विभागाने केली असून सुधारित आराखडा व अंदाजपत्रकास खालील अटींच्या अधीन राहून सहमती दर्शविली आहे.

१) सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या रु.१५६.०९ लक्ष इतक्या रकमेच्या मर्यादेतच उर्वरित बांधकामाचा खर्च करण्यात येईल. सदर मर्यादेपेक्षा अधिक खर्च होणार नाही, याबाबत जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी दक्षता घ्यावी.

२) स्मारकाचे बांधकाम पूर्ण होण्यास आणखी विलंब होणार नाही, सदर काम हे नियोजित वेळेतच पूर्ण होईल, याबाबत जिल्हाधिकारी,रत्नागिरी यांनी खबरदारी घ्यावी व स्मारकाच्या बांधकामाबतची सद्यस्थिती शासनास वेळोवळी अवगत करावी.

३) स्मारकाच्या उर्वरित खर्चासाठी विहित कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

२. कै. बाळासाहेब सावंत यांच्या मौजे जाकीमि-या, रत्नागिरी येथे उभारण्यात येणा-या स्मारकाच्या कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (उत्तर), रत्नागिरी यांनी तयार केलेल्या सुधारित आराखडा व अंदाजपत्रकानुसार रु. १,५६,०९,०००/- (रु. एक कोटी छपन्न लाख नऊ हजार फक्त) इतक्या सुधारित खर्चाच्या अंदाजपत्रक व आराखडयास वर नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून, तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग अनौ. संदर्भ क्र. ४४७/इमा-३,दिनांक २/३/२०१७ व वित्त विभाग अनौ.संदर्भ क्र. १०९/२०१८/व्यय-४,दिनांक ५/३/२०१८ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार वित्तीय अधिकार अधिनियम पुस्तिका १९७४ मधील भाग पहिला, उप विभाग तीन, अनुक्रमांक चार, परिच्छेद क्र.२७ (२) नुसार प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार या आदेशान्वये सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४१६१५३७५२६३०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Mahesh Kisan Wavhal

Digitally signed by Mahesh Kisan Wavhal
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400027, st=Maharashtra, 2.5.4.20=20283e5186ccca8f0350182971072649a1b738829e2db98425839104e8e271f1, cn=Mahesh Kisan Wavhal
Date: 2018.04.16 15:39:30 +05'30'

(म.कि. वाव्हळ)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.पालकमंत्री, जिल्हा रत्नागिरी,
४. प्रधान सचिव (र.व का.), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
५. सचिव, (बांधकामे) सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय,मुंबई,
६. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन,सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई.
७. जिल्हाधिकारी, रत्नागिरी.
८. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई,
९. महालेखापाल -१ (लेखापरिक्षा), मुंबई.
१०. जिल्हा कोषागार अधिकारी, रत्नागिरी.
११. सहसंचालक, लेखा व कोषागारे,संगणक कक्ष,५ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई.
१२. निवासी उपजिल्हाधिकारी,रत्नागिरी.
१३. कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग (उत्तर),रत्नागिरी.
१४. कक्ष अधिकारी (कार्यासन व्यय- ४/अर्थसंकल्प-१४), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
१५. कक्ष अधिकारी (कार्या-२५ /कार्या-२६), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६. कार्यासन अधिकारी (इमा-३),सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय, मुंबई.
१७. निवडनस्ती (कार्यासन २९), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई